प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध

• वर्ष ७२ • शुक्रवार, १४ मे २०१० • पाने बारा • किंमत ३ रुपये

# परमसद्गुरु गजानन महाराज जयंतीनिमित्त रविवारी पद्मजा फेणाणींची भक्तीसंगीत सेवा

सोलापूर (प्रतिनिधी) : स्वामी समर्थ महाराजांनी स्थापन केलेल्या दिव्य गुरुपीठावरील चौथे महापुरूष परमसद्गुरू श्री गजानन महाराजांच्या जन्मदिनानिमित्त रविवार, १६ मे रोजी रात्री ९ वाजता पद्मश्री पद्मजा फेणाणी (जोगळेकर) यांचा भक्तीगीतांचा कार्यक्रम होणार असल्याची माहिती जितेंद्रकुमार जाजू व विद्याधर पारखे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवपुरी (अक्कलकोट) येथे होणाऱ्या या कार्यक्रमातून पद्मजा फेणाणी महाराजांच्या जन्मवेळेपर्यंत म्हणजेमध्यरात्रीनंतर१२.४२वाजेपर्यंत



पद्मश्री पद्मजा फेणाणी-जोगळेकर

गायन सेवा रुजू करणार आहेत. दरवर्षी महाराजांच्या जन्मदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येतो. यामध्ये देश-विदेशातील अनुयायी सहभागी होतात. यात प्रामुख्याने श्रमसेवा, वैदिक जीवनपद्धतीची शिकवण, अग्निहोत्र प्रचार प्रसार वृत्तांत, योग व रात्री जन्मवेळेपर्यंत संगीत, भक्तीगीते, आराधना अशा कार्यक्रमांचा आनंदोत्सव असतो. यावर्षीही देश-परदेशातील अनुयायी श्रमसेवा करतील. जन्मदिवशी गणेश याग हवन, महामृत्यूंजय मंत्र हवन आदी कार्यक्रम होत आहेत.

तरी भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभघ्यावा, असे आवाहन विश्वस्तांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस वि. रा. तथा दादा शिरसीकर उपस्थित होते.